जनसंपर्क कक्ष
20 JUL 2024
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ शिष्यवृत्ती योजनेत महिला सायबर महाविद्यालय प्रथम



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत सायबर ट्रस्ट संचालित महिला महाविद्यालयास प्रथम क्रमांक मिळाला.

कोल्हापूर, ता. १९ : सायबर ट्रस्ट संचालित कॉलेज ऑफ नॉन-कन्व्हेंशनल व्होकेशनल कोर्सेस फॉर वूमेन, कोल्हापूर महाविद्यालयास शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमात २०२३-२४ चे पहिल्या क्रमाकांचे पारितोषिक कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रभारी प्राचार्या प्रज्ञा कापडी यांनी प्रशस्तिपत्रक स्वीकारले. ऋतुजा डोंगरे, वैष्णवी कुलकर्णी, विद्या माने व परहिना परांदे, पूर्णा वनजू या विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळाली. त्यांना सायबर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. आर. ए. शिंदे, विश्वस्त एच. आर. शिंदे, प्राचार्य डॉ. ए. आर. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2024
लोकमत

# माने विद्यालय शिष्यवृत्तीत प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

कागल : शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालयीन गुणवत्ता शिष्यवृत्तीत निमशहरी गटातून येथील डी. आर. माने महाविद्यालयाला सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळाला आहे. मानव्य विद्या व वाणिज्य शाखा या दोन्हीतही उज्ज्वल कामगिरी बजावली आहे.

या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. के. शिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाचे कॅम्पस संचालक डॉ. प्रवीण चौगले विभाग प्रमुख प्रा. सचिन कांबळे यांचा सत्कार केला. यावेळी प्र-कुलगुरू, डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. अभयसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. कृष्णात महाजन यांसह महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. नीला जोशी उपस्थित होत्या. यावर्षी महाविद्यालयातील २५ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2024
सकाळ

# कॉमर्समध्ये 'घाळी' विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज, ता. १९ : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक निमशहरी विभागातून येथील डॉ. घाळी कॉलेजच्या कॉमर्स व व्यवस्थापन विभागाला मिळाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी, सहसचिव गजेंद्र बंदी, प्र. प्राचार्य डॉ. दत्ता पाटील, डॉ. एम. डी. पुजारी यांनी पारितोषिक स्वीकारले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 JUL 2024

लोकमत

# दूरशिक्षणच्या 'बी.ए., बी.कॉम.'साठी प्रवेश सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या बी. ए., बी. कॉम. अभ्यासक्रमाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली असून, ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

डॉ. मोरे म्हणाले की, जे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निम्न शासकीय अथवा खासगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांना दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध आहे.

20 JUL 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज महाविद्यालय निमशहरी गटात प्रथम

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथील शिवराज महाविद्यालयाने २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती मध्ये वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत ग्रामीण गटात प्रथम क्रमांक पटकावला. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.



प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवताना डॉ. डी. टी. शिर्के. उपस्थित डॉ. पी. एस. पाटील व अन्य.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवणारे महाविद्यालय म्हणून शिवराज महाविद्यालयाने आपलेपण जपले आहे. संस्था अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, सचिव डॉ. अनिलराव कुराडे यांच्या मार्गदर्शनाने महाविद्यालयात विविध उपक्रमशील व कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या योजना राबवल्या जातात. महाविद्यालयातील पारंपरिक व व्यावसायिक शिक्षणाचा लाभ या उपविभागातील आणि सीमाभागातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, या उद्देशाने शिवराज महाविद्यालयाचा हा 'ज्ञानरथ' पुढे वाटचाल करीत आहे. 'शिवराज'च्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा कणा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न शिवराज महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे प्राचार्य डॉ. कदम यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे आयोजित गौरव समारंभात प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. दीपक खेडकर, डॉ. महेश चौगुले उपस्थित होते.